मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 26 ऑगस्ट 2025 | पान - 1

# पिंपरी-चिंचवडच्या विकासाला गती! मेट्रो, ERTS, पार्किंगवर भर!

## नगरसदस्यांच्या सूचनांची कालबद्ध अंमलबजावणी करण्याचे महापौर रवि लांडगे यांचे निर्देश!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि भविष्यातील नागरी गरजा लक्षात घेऊन शहरातील वाहतूक व्यवस्था, सार्वजनिक सुविधा आणि नागरी व्यवस्थापन अधिक सक्षम, आधुनिक व नागरिकाभिमुख करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. शहराच्या दीर्घकालीन विकासाचे नियोजन करताना लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करून प्रत्येक महत्त्वपूर्ण प्रकल्पाला गती देण्यात यावी. तसेच नगरसदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा गांभीर्याने विचार करून त्यानुसार योजनांमध्ये आवश्यक सुधारणा व प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले.**



ऑगस्ट मधील महापालिका सभेमध्ये सुचविल्याप्रमाणे आज महानगरपालिकेच्या विविध महत्त्वपूर्ण प्रकल्प व धोरणांचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यामध्ये महामेट्रो फेज-२ अंतर्गत निगडी ते चाकण मार्गिका, ईआरटीएस (ERTS) बस सेवा, वाहन पार्किंग धोरण आणि सार्वजनिक शौचालय धोरण या शहराच्या भविष्यातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश होता.

आज झालेल्या विविध सादरणीकरणास उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर ,आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह विधी समिती सभापती सुजाता बोराटे,शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे,महिला व बालकल्याण समिती सभापती राणीमाई पठारे,शिक्षण समिती सभापती, रवीना अंगोळकर, क्रीडा,कला,सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे,प्रभाग अध्यक्ष मंदार देशपांडे,तृप्ती कांबळे,आरती चौंधे,अर्चना सस्ते,अर्चना करांडे,शिवानी नरळे,सविता खुळे,नगरसदस्य योगेश बहल,विठ्ठल काटे,सागर गवळी,सुलभा उबाळे,श्रुती वाकडकर, शाम जगताप,जालिंदर शिंदे,राजश्री लांडगे,योगेश लांडगे,विराज लांडे,नितीन लांडगे,डॉ.सुहास कांबळे,वैशाली घोडेकर,सारिका मासुळकर,सोनम मोरे,नितीन काळजे,सचिन तापकीर,श्रुती डोळस,कृष्णा सुरकुले,शैलजा मोरे,अमित गावडे,धर्मपाल तंतरपाळे,निलेश तरस,आशा सूर्यवंशी,पल्लवी वाल्हेकर,विकास साने,यश साने,शेखर चिंचवडे,अनंत कोऱ्हाळे, अनुराधा गोरखे,सुप्रिया चांदगुडे,रिटा सानप,योगिता नागरगोजे, निलेश नेवाळे,पंकज भालेकर,अरुणा लंगोटे,वर्षा जगताप, संदीप वाघेरे,प्रियंका कुदळे,शालिनी गुजर,माया बारणे,शितल वर्णेकर,अनिल घोलप,रेश्मा भुजबळ,स्नेहा कलाटे,संदीप कस्पटे,बाबासाहेब त्रिभुवन,अर्चना तापकीर,अनिता काटे,कुंदा भिसे,शकुंतला धराडे,शशिकांत कदम,निता पाडाळे,कोमळ काळे तसेच शहर अभियंता मनोज सेठीया,मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे,सह शहर अभियंता बापू गायकवाड,उप आयुक्त अण्णा बोदडे,डॉ.प्रदीप ठेंगल,यासह महापालिकेच्या संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या मार्गिकेमुळे नागरिकांचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुविधाजनक होण्यास मदत होणार असून रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण

## निगडी-चाकण महामेट्रो मार्गिकेला गती द्या!

**पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी प्रस्तावित महामेट्रो फेज-२ अंतर्गत निगडी ते चाकण मार्गिकेचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. पिंपरी-चिंचवडमधील निवासी व व्यावसायिक भागांना चाकण औद्योगिक पट्ट्याशी अधिक प्रभावीपणे जोडण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**

कमी करण्यासही हातभार लागणार आहे. प्रस्तावित मार्गिका, स्थानके आणि शहराच्या विविध भागांना मिळणारी कनेक्टिव्हिटी यासंदर्भात नगरसदस्यांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या.

“मेट्रो हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नसून शहराच्या पुढील अनेक दशकांच्या विकासाची दिशा ठरविणारा प्रकल्प आहे. त्यामुळे शहरातील नागरिक, औद्योगिक क्षेत्र आणि भविष्यातील विस्तार यांचा विचार करून प्रत्येक निर्णय घेतला पाहिजे,” असे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले. नगरसदस्यांनी मांडलेल्या व्यवहार्य सूचनांचा पुढील नियोजनात समावेश करून आवश्यक कार्यवाहीला गती देण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित यंत्रणेला दिले. ईआरटीएस बस सेवेत नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला प्राधान्य पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात ईआरटीएस (ERTS) बस सेवा सुरू करण्याच्या प्रस्तावाबाबतही सविस्तर सादरीकरण करण्यात आले. नागरिकांना जलद, सुलभ व कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे, प्रमुख मार्गांवरील वाहतुकीचा ताण कमी करणे आणि खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी करून सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे या दृष्टीने या सेवेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हा प्रकल्प लवकर पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत असे स्पष्ट केले. बससेवेचे प्रस्तावित मार्ग, प्रवाशांना उपलब्ध होणाऱ्या सुविधा, विविध भागांमधील कनेक्टिव्हिटी आणि अंमलबजावणीची प्रक्रिया यावर चर्चा करण्यात आली.

ईआरटीएसचे मार्ग निश्चित करताना केवळ तांत्रिक बाबींचा विचार न करता नागरिकांचा दैनंदिन प्रवास, औद्योगिक क्षेत्रातील कामगार, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शहरातील प्रमुख वाहतूक केंद्रांची गरज लक्षात घेऊन नियोजन करावे, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी दिल्या. पार्किंग धोरण नागरिकांसाठी सुलभ असावे शहरातील वाढत्या वाहनसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या पार्किंग समस्येवर दीर्घकालीन आणि शिस्तबद्ध उपाययोजना करण्यासाठी प्रस्तावित वाहन पार्किंग धोरणाचेही सादरीकरण करण्यात आले.

प्रमुख बाजारपेठा, व्यापारी क्षेत्रे, गर्दीची ठिकाणे आणि सार्वजनिक परिसरातील पार्किंगचे नियोजन करताना उपलब्ध जागेचा अधिकाधिक परिणामकारक वापर करण्यासोबतच वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश महापौरांनी दिले.

पार्किंग धोरण हे नागरिकांना त्रास देणारे नव्हे, तर त्यांची समस्या सोडविणारे असले पाहिजे, अशी भूमिका महापौर रवि लांडगे यांनी मांडली. धोरणाच्या अंमलबजावणीपूर्वी स्थानिक परिस्थिती, नागरिकांच्या गरजा आणि नगरसदस्यांच्या सूचनांचा योग्य विचार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छता व देखभालीवर विशेष भर शहरातील सार्वजनिक स्वच्छता अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक शौचालय धोरणाबाबतही बैठकीत सादरीकरण करण्यात आले. सार्वजनिक शौचालयांची उपलब्धता, स्वच्छता, नियमित देखभाल-दुरुस्ती, सुरक्षितता आणि नागरिकांसाठी आवश्यक सुविधा यांचा सर्वसमावेशक विचार करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

“केवळ सार्वजनिक शौचालयांची उभारणी करून महापालिकेची जबाबदारी संपत नाही. ते नियमितपणे स्वच्छ, सुरक्षित आणि वापरण्यायोग्य राहिले पाहिजेत. नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा देणे ही महापालिकेची मूलभूत जबाबदारी आहे,” असे महापौर रवि लांडगे यांनी स्पष्ट केले. नगरसदस्यांच्या सूचनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करा सादरीकरणादरम्यान उपस्थित नगरसदस्यांनी शहराच्या विविध भागांतील स्थानिक परिस्थिती, नागरिकांच्या अपेक्षा आणि संबंधित प्रकल्पांच्या अनुषंगाने विविध महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. या सूचना केवळ नोंदवून न ठेवता त्यांची व्यवहार्यता तपासून संबंधित योजना व धोरणांमध्ये आवश्यकतेनुसार समावेश करण्याचे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी प्रशासनाला दिले.

प्रत्येक संबंधित विभागाने नगरसदस्यांच्या सूचनांवर केलेल्या कार्यवाहीचा स्वतंत्र आढावा घ्यावा, आवश्यक बदल प्रत्यक्ष अंमलात आणावेत आणि त्याबाबतचा प्रगती अहवाल कालबद्ध पद्धतीने सादर करावा, महापौरांनी स्पष्ट केले. ‘आजचे नियोजन उद्याच्या पिंपरी-चिंचवडसाठी’ पिंपरी-चिंचवड हे वेगाने विकसित होणारे औद्योगिक निवासी शहर असून आगामी काळातील लोकसंख्या व नागरी विस्तार लक्षात घेऊन सक्षम पायाभूत सुविधांची उभारणी करणे आवश्यक असल्याचे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

# स्थायी समितीच्या सभेत विविध विकासकामे विषयांवर निर्णय!

## पुनावळेतील रस्ते व जलनिस्सारणासह आरोग्य, शिक्षण आणि डिजिटल सुरक्षेच्या प्रस्तावांना मंजुरी!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा आज, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेत शहरातील संगणक प्रणालीची सुरक्षितता, महिला सक्षमीकरण, मत्स्यव्यवसाय, रस्ते विकास, वैद्यकीय सुविधा, क्षेत्रीय कार्यालयांची पुनर्रचना आणि विद्यार्थ्यांसाठीच्या शैक्षणिक उपक्रमांसह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.**



> "स्थायी समितीच्या सभेत मंजूर करण्यात आलेले हे प्रस्ताव शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. पायाभूत सुविधांचा विकास, रस्ते व जलनिस्सारणाची कामे, महापालिकेच्या प्रशासकीय व्यवस्थेचे बळकटीकरण, आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साधने उपलब्ध करून देण्यावर या निर्णयांमधून भर देण्यात आला आहे. नागरिकांना अधिक सक्षम आणि दर्जेदार नागरी सुविधा मिळाव्यात, यासाठी महापालिकेच्या माध्यमातून विकासकामांना सातत्याने प्राधान्य दिले जाईल."
>
> -अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

पुनावळे परिसरातील पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी रस्ते विकास आणि जलनिस्सारणाच्या विविध कामांना स्थायी समितीने मंजुरी दिली. पुनावळे बी.आर.टी.एस. रोडपासून पुनावळे अंडरपासपर्यंत १८ मीटर रुंद रस्ता विकसित करण्यास तसेच पावसाळी पाण्याचा निचरा करण्यासाठी आवश्यक जलनिस्सारण वाहिन्या उभारण्याच्या कामाला सुधारित अंदाजपत्रकासह मान्यता देण्यात आली. यामुळे परिसरातील वाहतूक व्यवस्था आणि पावसाळ्यातील पाणी निचरा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

यासोबतच चिंचवड मतदारसंघातील विशालनगर, पिंपळे निलख परिसरातील गणपती चौक ते छत्रपती बँक ते साईश्री कॉलनी या १२ मीटर रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामालाही मंजुरी देण्यात आली. परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या रस्ते सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

आरोग्य सुविधांच्या दृष्टीने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या सर्जरी विभागासाठी निगेटिव्ह प्रेशर वुंड थेरपी मशीनसाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच पदव्युत्तर पदवी संस्था आणि रुग्णालयासाठी आवश्यक विविध वैद्यकीय साहित्य खरेदी करण्याच्या प्रस्तावांनाही मान्यता देण्यात आली.

विद्यार्थ्यांसाठीही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. महापालिकेच्या माध्यमिक विद्यालयांमधील विद्यार्थ्यांना 'एज्युराईज (न्यूजपेपर इन एज्युकेशन)' उपक्रमांतर्गत साप्ताहिक अंक उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात महापालिकेच्या १६ माध्यमिक विद्यालयांतील विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळणार आहे. विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमासोबतच चालू घडामोडी आणि विविध विषयांची माहिती मिळण्यास यामुळे मदत होणार आहे.

प्रभाग क्रमांक २ चिखली परिसरातील महापालिका इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांनाही स्थायी समितीने मंजुरी दिली. यामुळे संबंधित महापालिका इमारतींची आवश्यक दुरुस्ती करून नागरिकांसाठीच्या सेवांमध्ये सुधारणा करण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, महापालिकेच्या संगणक यंत्रणेची डिजिटल सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी ३ हजार संगणकांसाठी अँटी व्हायरस खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली. या अँटी व्हायरससाठी तीन वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, त्यासोबत तीन वर्षांसाठी एक सपोर्ट स्टाफ नियुक्त करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेच्या संगणक प्रणालीचे सायबर धोके आणि व्हायरसपासून संरक्षण करण्यास मदत होणार आहे.

स्थायी समितीच्या बैठकीत मंजूर झालेल्या या विविध प्रस्तावांमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील रस्ते व जलनिस्सारण व्यवस्था, आरोग्य सुविधा, शैक्षणिक उपक्रम, महापालिका इमारतींची देखभाल तसेच डिजिटल प्रणालीची सुरक्षितता यांना चालना मिळणार आहे. नागरिकांना अधिक सक्षम आणि दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे निर्णय महत्त्वपूर्ण असल्याचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी सांगितले.

# पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली व सोलापूरवासीयांचा कौटुंबिक सत्कार समारंभ!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली व सोलापूरवासीयांच्या वतीने आयोजित दहावी व बारावीतील यशस्वी विद्यार्थी तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात समाजोपयोगी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार समारंभ व कौटुंबिक स्नेहमेळावा रविवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२६ रोजी साकोसा प्राधिकरण येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.**





या स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून समाजाचे नाव उंचावणाऱ्या गुणवंतांचा गौरव करण्यात आला. तसेच समाजातील विविध घटकांना एका व्यासपीठावर एकत्र आणत आपुलकी, स्नेह, सामाजिक एकोपा आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संदेश देण्यात आला. गुणवंतांच्या कार्याचा सन्मान करण्यासोबतच त्यांच्या यशातून इतरांना प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

यावेळी शितल ताई धनंजय वर्णेकर, नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्या, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या हस्ते दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि विविध समाजोपयोगी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

तसेच समाजासाठी सातत्याने उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्य करणारे डॉ. धनंजय वर्णेकर सर यांना 'समाजभूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री मा. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करून डॉ. धनंजय वर्णेकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

सामाजिक, शैक्षणिक तसेच विविध समाजोपयोगी क्षेत्रात त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत मिळालेला हा सन्मान निश्चितच अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आहे. डॉ. धनंजय वर्णेकर सर यांचे मनःपूर्वक अभिनंदन! त्यांच्या पुढील सामाजिक, शैक्षणिक आणि समाजोपयोगी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा. भविष्यातही त्यांच्या कार्यातून समाजातील अनेक घटकांना प्रेरणा मिळावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री मा. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार श्री. अमित गोरखे, आमदार श्री. शंकरभाऊ जगताप, माजी आमदार अश्विनीताई जगताप, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, मा. शैलजाताई मोरे, प्राधिकरण अध्यक्ष श्री. सदाशिवजी खाडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पालक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि जागरूक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने स्नेहमेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्यासोबतच समाजातील इतर घटकांनीही सामाजिक बांधिलकी जपत समाजहितासाठी योगदान द्यावे, असा सकारात्मक संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

गुणवंतांचा सन्मान, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि समाजहिताच्या कार्याला पाठबळ देणारे असे उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरतात. अशा कार्यक्रमांमुळे विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या कार्याची दखल घेतली जात असल्याची भावना मिळते आणि समाजासाठी अधिक चांगले कार्य करण्याची प्रेरणाही मिळते.

### डॉ. वर्णेकर यांना 'समाजभूषण' पुरस्कार

समाजासाठी सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. धनंजय वर्णेकर सर यांना 'समाजभूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थी आणि कला, क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

# विद्यार्थिनीला दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी राहुल गांधी पुन्हा पुण्यात?

## मांजरीतील आंदोलनस्थळी भेटची शक्यता; 'छात्रों की गूंज' आश्वासनानंतर दौऱ्याची चर्चा!

**» पुणे | प्रतिनिधी**

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी येत्या काही दिवसांत पुन्हा पुणे दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात पुण्यात झालेल्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रमादरम्यान आदिवासी विद्यार्थिनीला दिलेल्या आश्वासनानुसार ते मांजरी येथील आदिवासी वसतिगृह आणि आंदोलनस्थळी भेट देण्याची शक्यता असल्याची माहिती समोर आली आहे. काँग्रेसच्या आदिवासी विभागाकडून तसेच शहर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून या दौऱ्याला दुजोरा देण्यात आला आहे.**




राहुल गांधी गेल्या आठवड्यात पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या 'छात्रों की गूंज' या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक अडचणी, विविध समस्या आणि शासनाकडून अपेक्षा जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रश्नांवर राहुल गांधी यांनी सविस्तर चर्चा केली. या संवादादरम्यान मांजरी येथील आदिवासी विद्यार्थिनीने दुर्गम भागातील आश्रमशाळांची दुरवस्था, आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील विविध अडचणी, विद्यार्थ्यांसाठी असलेली वयाची अट तसेच विद्यार्थिनींना भेडसावणाऱ्या अन्य समस्यांकडे राहुल गांधी यांचे लक्ष वेधले.

मांजरी येथे या विविध मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थिनी आणि विद्यार्थी आंदोलन करत असून, त्यांच्या आंदोलनाची राज्य सरकारकडून अपेक्षित दखल घेतली जात नसल्याचा आरोप संबंधित विद्यार्थिनीने केला. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, आंदोलनात सहभागी झालेल्या काही विद्यार्थिनी आजारी पडल्याची व्यथाही तिने राहुल गांधी यांच्यासमोर मांडली. विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही तिने व्यक्त केली.

या प्रश्नांबाबत आदिवासी विभागाच्या मंत्र्यांची भेट घेऊन मागण्यांकडे लक्ष वेधण्यात आले होते. मात्र, या विषयावर अंतिम निर्णय मुख्यमंत्रीच घेतील, असे संबंधित मंत्र्यांकडून सांगण्यात आल्याचे विद्यार्थिनीने राहुल गांधी यांना सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

विद्यार्थिनीने मांडलेल्या सर्व समस्या आणि आंदोलनाची परिस्थिती जाणून घेतल्यानंतर राहुल गांधी यांनी स्वतः आंदोलनस्थळी भेट देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार येत्या काही दिवसांत राहुल गांधी मांजरी येथे येऊन आदिवासी विद्यार्थ्यांची भेट घेण्याची शक्यता असल्याची माहिती काँग्रेसच्या आदिवासी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष विक्रांत भुरिया यांनी माध्यमांशी बोलताना दिली. शहर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडूनही या संभाव्य दौऱ्याला दुजोरा देण्यात आला आहे.

राहुल गांधी यांच्या या संभाव्य भेटीमुळे मांजरी येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला राजकीय पातळीवर अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सरकारकडून कोणती भूमिका घेतली जाते, तसेच राहुल गांधी प्रत्यक्ष आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधतात का, याकडे आता राजकीय वर्तुळासह नागरिकांचेही लक्ष लागले आहे.

### रोहित पवारांकडून आंदोलक विद्यार्थ्यांची भेट!

**दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मांजरी येथे आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत ठोस निर्णय घेण्याची मागणी केली.**

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनीही मांजरी येथे आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने तातडीने आणि ठोस निर्णय घ्यावा, अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली. विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

"विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत ठोस निर्णय झाला पाहिजे. अन्यथा हे आंदोलन अधिक तीव्र होईल. न्याय मिळणार नसेल तर संबंधित विभागाच्या मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणीही आता पुढे येत आहे. कोणत्याही परिस्थितीत मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलनातून माघार घेऊ नका. आम्ही सर्वजण विद्यार्थ्यांच्या बरोबर आहोत," असा विश्वास रोहित पवार यांनी आंदोलक विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष विशाल तांबे, श्रीकांत पाटील, सुनील माने आणि किशोर कांबळे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना पाठिंबा देत त्यांच्या मागण्यांवर शासनाने सकारात्मक आणि तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांकडून सांगण्यात आले.

मांजरी येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांमध्ये आश्रमशाळांची स्थिती, वसतिगृहातील सुविधा, वयाची अट आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसह विविध प्रश्नांचा समावेश आहे. या मागण्यांवर सरकारकडून पुढील काळात कोणती पावले उचलली जातात, याकडे विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे लक्ष आहे. त्यातच राहुल गांधी यांच्या संभाव्य भेटीमुळे या आंदोलनाला आणखी व्यापक स्वरूप मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राहुल गांधी प्रत्यक्ष मांजरी येथे भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधतात का आणि त्यांच्या मागण्यांबाबत पुढील भूमिका काय घेतात, सर्वांचे लक्ष लागले आहे.

# हिंजवडी आयटी पार्कची कोंडी! आयटी कर्मचारी अन् नागरिक उतरणार रस्त्यावर!

**» पुणे | प्रतिनिधी**

**चाकण औद्योगिक परिसरातील पायाभूत सुविधांची समस्या सोडविताना सरकारची दमछाक होताना दिसत आहेत त्यातच आता हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कसह परिसरातील पायाभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या परिसरात काम करणाऱ्या लाखो आयटी कर्मचाऱ्यांसह स्थानिक नागरिकांना दररोज यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. या विरोधात आता रस्त्यावर उतरण्याचा निर्णय आयटी कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. आयटी पार्कमध्ये ६ सप्टेंबरला हे कर्मचारी आंदोलन करणार आहेत.**



हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कचा गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. त्यासोबतच परिसरात नागरिकीकरण, औद्योगिक विस्तार आणि लोकसंख्येत मोठी वाढ झाली आहे. मात्र, त्या तुलनेत रस्ते, वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा आणि इतर नागरी सुविधांचा अपेक्षित विकास झालेला नसल्याने आयटी कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांना दररोज विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

या आंदोलनात स्थानिक शेतकरी, रहिवासी, रेसिडेंट वेल्फेअर असोसिएशन माण, हिंजवडी-माण-मारूंजी इन्फ्रा फोरम, फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज, हिंजवडी एम्प्लॉईज अँड रेसिडेंट्स ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड को-ऑप हाऊसिंग फेडरेशन आणि मुळशी को-ऑप हाऊसिंग फेडरेशन यांसह विविध संघटना सहभागी होणार आहेत.

६ सप्टेंबर रोजी हिंजवडीतील मुख्य चौकातून मोर्चाला सुरुवात होईल. त्यानंतर इन्फोसिस सर्कलमार्गे शिवाजी चौकात मोर्चाची सांगता होणार आहे. आंदोलन पूर्णपणे शांततामय पद्धतीने करण्यात येणार असून, आयटी कर्मचारी आणि स्थानिक नागरिक हातात फलक घेऊन आपल्या मागण्या प्रशासनासमोर मांडणार आहेत.

याबाबत फोरम फॉर आयटी एम्प्लॉईजचे अध्यक्ष पवनजीत माने यांनी सांगितले की, हिंजवडी, माण आणि मारूंजी परिसरात आयटी पार्कचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. मात्र, वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत रस्ते, वाहतूक, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत नागरी सुविधांचा विकास झालेला नाही.

परिसरातील प्रशासकीय व्यवस्था अनेक शासकीय यंत्रणांमध्ये विभागली गेली असून, त्यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे विकासकामांना अपेक्षित गती मिळत नसल्याचेही त्यांनी सांगितले. नागरी समस्यांबाबत आयटी कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी शासनाकडे पाठपुरावा केला; मात्र परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झाली अखेर आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.

# धक्कादायक! कंत्राटदारांच्या 'पीएमपी' बस ठरतायत जीवघेण्या?

## पाच महिन्यांत ११ मृत्यू; आता अपघात झाल्यास ३ लाख रुपयांपर्यंत भरपाई'!

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) बस जीवघेण्या ठरू लागल्या असून, गेल्या पाच महिन्यांत 'पीएमपी' वाहनांच्या अपघातात ११ मृत्यू झाले आहेत. त्यामध्ये नऊ जणांचे मृत्यू हे भाडेतत्त्वावरील कंत्राटदाराच्या वाहनांमुळे झाल्याचे समोर आले आहे. 'पीएमपी'च्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत 'पीएमपी'च्या गाड्यांचे २३ अपघात झाले. त्यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाला, तर १० जण गंभीर जखमी झाले.**



या अपघातांच्या आकडेवारीत खासगी कंत्राटदारांच्या गाड्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे. 'पीएमपी'च्या मालकीच्या गाड्यांचे आतापर्यंत सात अपघात झाले असून, या अपघातांमध्ये दोन जणांचा मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. दुसरीकडे, भाडेतत्त्वावर घेण्यात आलेल्या कंत्राटदारांच्या गाड्यांचे १६ अपघात झाले आहेत. या अपघातांमध्ये तब्बल नऊ जणांचा मृत्यू झाला असून, सात जण गंभीर जखमी झाले आहेत. नुकत्याच झालेल्या एका अपघातात अवघ्या २२ वर्षांचा तरुण 'पीएमपी'ची भाडेतत्त्वावरील बस चालवत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सध्या 'पीएमपी'च्या ताफ्यात स्वमालकीच्या सुमारे ६८४ गाड्या असून, त्यासाठी २ हजार ३६४ चालक कार्यरत आहेत. तर भाडेतत्त्वावरील तब्बल १ हजार २७७ गाड्या असून, त्या चालविण्यासाठी ३ हजार २१४ चालक आहेत. याशिवाय 'पीएमपी'च्या ताफ्यातील सर्व ई-बस खासगी ठेकेदारांमार्फत चालविण्यात येतात. त्यामुळे खासगी कंत्राटदारांच्या वाहनांची संख्या मोठी असल्याने त्यांच्या वाहनांच्या अपघातांचे प्रमाणही अधिक असल्याचे दिसून येत आहे.

वाहनचालकांकडून सुरक्षित आणि जबाबदारीने वाहन चालविले जावे, यासाठी 'पीएमपी' प्रशासनाने एप्रिल २०२५ पासून चालक प्रशिक्षणाची विशेष मोहीम सुरू केली आहे. या प्रशिक्षणामध्ये सुरक्षित वाहन चालविण्याच्या पद्धतींसोबतच अपघात किंवा इतर आणीबाणीच्या परिस्थितीत घ्यावयाची काळजी, तातडीच्या उपाययोजना, प्रवाशांशी वर्तन तसेच चालकांचे समुपदेशन अशा विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे. अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी चालकांच्या प्रशिक्षणावर अधिक भर देण्याची गरज व्यक्त होत आहे.

दरम्यान, 'पीएमपी'च्या बसच्या अपघातात जखमी होणाऱ्या प्रवाशांना यापूर्वी ५० हजार रुपयांपर्यंत, तर अपघातात मृत्यू झाल्यास दोन लाख रुपयांपर्यंत तातडीची आर्थिक मदत दिली जात होती. मात्र, आता या मदतीच्या रकमेत वाढ करण्याचा निर्णय 'पीएमपी' प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना एक लाख रुपये, तर मृत्यू झाल्यास तीन लाख रुपयांपर्यंतची भरपाई तातडीने देण्यात येणार आहे.

तसेच अपघातामुळे एखाद्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याचीही दखल घेण्यात येणार आहे. सरकारी नियमांनुसार पंचनामा करून संबंधित नुकसान निश्चित केले जाईल आणि त्यानुसार भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोमवारी, २४ ऑगस्ट रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत यासंदर्भातील निर्णय घेण्यात आल्याची माहिती 'पीएमपी'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

'पीएमपी'च्या मोठ्या बसमुळे समोरून होणाऱ्या अपघातांमध्ये नेमकी परिस्थिती काय होती, हे स्पष्ट होण्यासाठी बसमध्ये डॅश कॅम बसविण्याचा प्रस्तावही संचालक मंडळासमोर मांडण्यात आला आहे. या कॅमेऱ्यांमध्ये बसच्या समोरील रस्त्याचा तसेच चालकाच्या बाजूच्या आतील भागाचा व्हिडिओ रेकॉर्ड होईल. त्यामुळे अपघाताच्या वेळी बसचालकाची चूक होती की समोरच्या वाहनाची, हे निश्चित करण्यास मदत होणार आहे.


'पीएमपी'चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी सांगितले की, डॅश कॅम बसविण्याचा प्रस्ताव आतापर्यंत तीन वेळा संचालक मंडळासमोर मांडण्यात आला आहे. मात्र, अद्याप त्याला मंजुरी मिळालेली नाही. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास अपघाताच्या वेळी घडलेल्या घटनांची दृश्य नोंद उपलब्ध होईल आणि अपघाताचे नेमके कारण शोधणे अधिक सोपे होणार आहे.

बसच्या पुढील भागासोबतच मागील बाजूने होणाऱ्या अपघातांचाही अभ्यास करण्यात येत आहे. मागील बाजूने होणाऱ्या अपघातांची कारणे शोधण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान आणि उपाययोजनांचा विचार केला जात असल्याचेही महेश आव्हाड यांनी स्पष्ट केले. एकीकडे खासगी कंत्राटदारांच्या बसच्या अपघातांचे प्रमाण आणि त्यातील मृत्यूची संख्या चिंताजनक असताना, दुसरीकडे चालकांचे प्रशिक्षण, अपघातग्रस्तांना वाढीव आर्थिक मदत आणि बसमध्ये डॅश कॅम उपाययोजनांमुळे अपघातांवर नियंत्रण मिळविण्याच्या प्रयत्नांना गती मिळण्याची अपेक्षा आहे.

# पुणे विभागात शाळा परिसरातील दोन आस्थापनांवर कारवाई!

**पुणे | प्रतिनिधी**

**अन्न व औषध प्रशासनाने 'सेफ फूड फॉर एव्हरी स्कूल चाइल्ड इन महाराष्ट्र' या मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांना सुरक्षित अन्न मिळावे, यासाठी २८ जुलै ते २१ ऑगस्ट या कालावधीत धडक मोहीम राबविली. या अंतर्गत पुणे विभागात ६५ शाळांची तपासणी करण्यात आली. पैकी दोन आस्थापनांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, त्यांचे व्यवसाय बंद करण्याचे आदेश देण्यात आले, अशी माहिती प्रशासनाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.**




प्रशासनाने पुणे विभागात शालेय परिसरातील अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत जनजागृती करण्यासाठी तब्बल २१ कार्यशाळांचे आयोजन केले. या कार्यशाळांमध्ये पुणे विभागातील ५ हजार ७६२ शाळा आणि ६ हजार ६३२ शिक्षक सहभागी झाले. विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळावे, तसेच शाळांच्या परिसरात अस्वच्छ किंवा आरोग्यास घातक खाद्यपदार्थांची विक्री होऊ नये, यासाठी या मोहिमेतून विशेष जनजागृती करण्यात आली.

या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुणे विभागातील शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महिला व बालविकास अधिकाऱ्यांसोबत थेट व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठका घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये शालेय परिसरातील खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेची तपासणी, नियमांचे पालन आणि दोषी आस्थापनांवर कारवाई याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर संबंधित विभागांनी संयुक्तपणे अंमलबजावणीचा आराखडा तयार करून प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात केली.

मोहिमेच्या पुढील टप्प्यात शाळांच्या ५० मीटर परिसरातील कँटीन, टपऱ्या, खाद्यपदार्थांची दुकाने आणि इतर आस्थापनांची प्रत्यक्ष तपासणी सुरू करण्यात आली. या तपासणीदरम्यान अस्वच्छता आढळणे, मुदतबाह्य खाद्यपदार्थांची विक्री करणे, अन्नपदार्थांच्या गुणवत्तेशी तडजोड करणे किंवा आवश्यक परवान्याशिवाय खाद्य व्यवसाय सुरू ठेवणे अशा प्रकारांची गंभीर दखल घेण्यात येत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर तत्काळ टाळे ठोकण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

'विद्यार्थ्यांना स्वच्छ आणि सुरक्षित अन्न मिळणे हा त्यांचा हक्क आहे. शालेय परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांविरुद्ध कोणतीही दया-माया न दाखवता अत्यंत कडक कारवाई पुढेही सुरूच राहील,' असा स्पष्ट इशारा 'एफडीए'चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. त्यामुळे शाळांच्या परिसरात खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर प्रशासनाची करडी नजर राहणार आहे.

दरम्यान, शालेय परिसरात अस्वच्छ, संशयास्पद किंवा आरोग्यास घातक खाद्यपदार्थ आढळल्यास नागरिकांनी तातडीने प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन 'एफडीए'कडून करण्यात आले आहे. यासाठी नागरिकांना टोल-फ्री क्रमांक १८००२२२३६५ तसेच महाएफडीए पोर्टलवर तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शालेय परिसरासोबतच पुणे विभागातील विविध भागांतही अन्न व औषध प्रशासनाच्या पथकांकडून तपासणी आणि कारवाई सुरू आहे.